२. पत्रावळ पुरविणेचे Schedule खालील प्रमाणे राहील.

| अ.नं | पुरवठा कालावधी | अंदाजे पुरवठा करावयाची पत्रावळ |
|---|---|---|
| १. | ऑक्टोबर २०२२ ते डिसेंबर २०२२ | ५,००,००० नग |
| २. | जानेवारी २०२३ ते मार्च २०२३ | ३,००,००० नग |
| ३. | एप्रिल २०२३ ते जून २०२३ | ५,००,००० नग |
| ४. | जुलै २०२३ ते सप्टेंबर २०२३ | ७,००,००० नग |

३. श्री साईबाबा संस्थानची सदर मागणी ही अंदाजित असल्यामुळे पुरवठा कालावधीत अगर त्यानंतरही पुढील वर्षाची खरेदी संबंधीत प्रक्रिया पुर्ण होईपावेतो आवश्यकतेनुसार मंजूर केलेल्या परिमाणापेक्षा २५ टक्केपर्यंत जादा पत्रावळीची मागणी श्री साईबाबा संस्थानकडून झाल्यास त्या मालाचा पुरवठा मान्य दरानेच करणे निविदाधारकावर बंधनकारक राहील.

४. पुरवठा आदेश दिल्यानंतर पुरवठा आदेशात नमूद पत्रावळीचा पुरवठा हा एकदम करावयाचा नसून श्री साईबाबा संस्थानचे गरजेप्रमाणे दरमहा मागणी चलन पुरवठादारास पाठविण्यात येतील. त्यामुध्ये नमूद परिमाण इतकीच पत्रावळीचा पुरवठा करावा लागेल. पुरवठा आदेशात नमूद केलेल्या परिमाणा (Quantity) ही अंदाजे रहाणार असून भक्तांच्या संख्येनुसार प्रत्यक्ष मागणी अवलंबून रहाणार आहे. त्यामुळे ई-निविदा किंवा पुरवठा आदेशात नमूद मालाइतके परिमाण (Quantity) खरेदी करणे श्री साईबाबा संस्थानवर बंधनकारक रहाणार नाही.

**K. पत्रावळ स्वीकार करण्याची पध्दत-**

१. पुरवठा आदेशातील वर्णनाप्रमाणेच पत्रावळीचा पुरवठा करावा व त्याप्रमाणेच पत्रावळीचे बिल सादर करावे.

२. ज्या नमुन्याच्या पत्रावळीची निविदा मंजुर होईल त्या दर्जाप्रमाणेच पत्रावळीचा पुरवठा करावा लागेल. कमी दर्जाची, वेगळया प्रकारची अगर जातीची किंवा खराब पत्रावळ स्विकारली जाणार नाही. अशा पत्रावळीचा पुरवठा झाल्यास ती स्वखर्चाने तात्काळ परत घेऊन जाणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहील. ती न नेल्यामुळे त्याची नासधूस झाल्यास त्यास श्री साईबाबा संस्थान जबाबदार राहणार नाही.

३. पुरवठाधारकाने पुरवठा आदेश दिलेनंतर निविदे सोबत दिलेल्या व मान्य झालेल्या नमुन्याप्रमाणेच पत्रावळ पुरवणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहिल.

४. पुरवठा आदेशाप्रमाणे संस्थानकडे पत्रावळ पाठविल्यानंतर श्री साईबाबा संस्थानने विहीत केलेले यंत्रणेकडून पत्रावळीची तपासणी केली जाईल. त्यांना योग्य वाटल्यास ती स्विकारण्यात येईल.

५. पत्रावळीसाठी वापरण्यात येणारे मटेरीअल Food grade Quality चे असावे.

६. पुरवठा करीत असलेल्या पत्रावळीची Quantity जास्त असल्यामुळे श्री साईबाबा संस्थानकडून Randomly Sample घेऊन पत्रावळ स्विकारली जाते. तथापी पत्रावळ स्विकारलेनंतरही एखादा लॉट, बंडल अगर काही खराब पत्रावळ आढळल्यास त्या स्वखर्चाने बदलून दयाव्या लागतील.

**L. लॅब तपासणीची कार्यपध्दती-**

१. पुरविलेल्या पत्रावळीची गरजेनुसार केंद्र शासनाच्या/राज्यशासनाच्या मान्यता प्राप्त प्रयोगशाळेतून तपासणी करणेत येईल.

२. श्री साईबाबा संस्थानने करुन घेतलेले लॅब तपासणीमध्ये पुरविलेल्या पत्रावळीचे रिपोर्ट विहित Standard प्रमाणे नसल्यास सदर पत्रावळ बदलून द्यावी लागेल. त्यादरम्यान श्री साईबाबा संस्थानला बाहेरुन पत्रावळ विकत घ्यावी लागल्यास जादा आलेल्या खर्चाची रक्कम अधिक पुरविलेल्या पत्रावळीच्या किंमतीच्या २ ते ५ टक्के दंड देय असलेल्या बील रकमेतून/सुरक्षा अनामत रकमेतून वसूल करण्यात येईल.

३. काही वेळेस लॅब रिपोर्ट येण्यासाठी विलंब होतो अशा वेळी जर पुरविलेली पत्रावळ वापरली गेली व नंतर लॅब रिपोर्ट Standard प्रमाणे न आल्यास त्या लॉटमधील पत्रावळीच्या किंमतीच्या २ ते ५ टक्केपर्यंत दंड आकारला जाईल.

